**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५२३

निर्णय दिनांक ०१-०७-२०१०

१ श्री. पांडुरंग दिगंबर चौधरी, : अपिलार्थी

रा. एन - ११, ए-८/४, सुदर्शननगर, हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

जिल्हा परिषद, माध्यमिक विभाग, शिक्षणाधिकारी, माध्यमिक कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, जय भवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-११-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचा आयोगास उद्देशून लिहिलेला दिनांक २२-६-२०१० रोजीचा अर्ज सादर करण्यात आला आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांची माहिती संदर्भात कोणतीही तक्रार राहिलेली नाही असे नमूद करुन, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १५२३/२००९ हे, ते स्वखुषीने मागे घेत आहेत, असे आयोगास अवगत केले आहे व या अर्जाच्या अखेरीस विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने दाखल केलेले विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे आणि ते रद्द करण्याची विनंती आयोगास केली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग दिगंबर चौधरी, रा. एन - ११, ए-८/४, सुदर्शननगर, हडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५२९

निर्णय दिनांक ०१.०७.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दबडे शिवाजी रामराव,<br>रा.रावणकोळा, ता.मुखेड,जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>सरस्वती प्राथमिक शाळा, रावणकोळा,ता.मुखेड,<br>जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती न मिळाल्याने आणि माहिती अधिकाराच्या नावाखाली लुबाडणूक व फसवणूक केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो माहिती अधिकाऱ्यास प्रत्यक्षात दि. २२.०६.२००९ रोजी प्राप्त झाला, त्यान्वये मुख्याध्यापक,

सरस्वती प्राथमिक शाळा, रावणकोळा यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात सन २००७ ते २००९ या कालावधीशी संबंधित विस्तृत व्याप्ती असलेली माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०१.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३६१६/- अधिक पोस्टेज खर्च रु.३००/- इतक्या रकमेचे चलन शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०.०७.२००९ रोजी या संदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०७.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थी आणि संबंधित संस्था यांच्या दरम्यान झालेल्या पत्रव्यवहाराचे अवलोकन केले असता, घटनाक्रमाच्या या टप्प्यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी त्यांच्या स्तरावर अपिलार्थीच्या दि. २०.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेणे उचित होईल, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. २०.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.२०.०७.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०१.०७.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दबडे शिवाजी रामराव,रा.रावणकोळा, ता.मुखेड,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,सरस्वती प्राथमिक शाळा, रावणकोळा, ता.मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५३२

निर्णय दिनांक ०१-०७-२०१०

१ श्री. दिलीप सी. जैन (मुगदीया), : अपिलार्थी
सरदार पटेल रोड, चेलीपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नगर भूमापन कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
नगर भूमापन कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद
त्रयस्थ पक्ष : श्री. बी. जी. बांगर (परिक्षण भूमापक)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-११-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २४-०७-२००९ रोजी प्राप्त झाला त्याअन्वये माहिती

अधिकारी, नगर भूमापन कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ३१-०८-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केला. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा सदर अपील अर्ज अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे सादर करण्यासाठी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९-०९-२००९ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले. परंतु अपिलार्थीने अशा प्रकारे कार्यवाही न करता वरील परिच्छेदा-मध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक ३१-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. अपिलार्थीच्या दिनांक ३१-०८-२००९ रोजीच्या मूळ प्रथम अपील अर्जाची प्रत अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे ७ दिवसाच्या आत पाठवून द्यावी आणि अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर या अपील अर्जावर त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिलीप सी. जैन (मुगदीया), सरदार पटेल रोड, चेलीपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५३४
निर्णय दिनांक ०२-०७-२०१०

१ श्री. बाळासाहेब म्हस्के, : अपिलार्थी
रा. राहुलनगर, रेल्वे स्टेशनजवळ, विनर बेकरीसमोर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सिंचन विभाग,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप अभियंता, जिल्हा परिषद सिंचन उपविभाग, कन्नड, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-११-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन) , जिल्हा परिषद, औरंगाबाद श्री. रावसाहेब मिराजी वाघमारे यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०१-०७-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून

संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक १५३४/२००९ हे, ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक १५३४/२००९, दिनांक ०९-११-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब म्हस्के, रा. राहुलनगर, रेल्वे स्टेशनजवळ, विनर बेकरीसमोर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद सिंचन उपविभाग, कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५३५

निर्णय दिनांक ०२-०७-२०१०

१ श्री. रामेश्वर तुळशीराम करपे, : अपिलार्थी
मु. पो. माळीवाडगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक श्रेणी-१, दुय्यम निबंधक कार्यालय, गंगापूर,
जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सह जिल्हा निबंधक श्रेणी-१, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

तथापि या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक श्रेणी-१, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले आदेश देणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक श्रेणी-१, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०१-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामेश्वर तुळशीराम करपे, मु. पो. माळीवाडगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, दुय्यम निबंधक कार्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक श्रेणी-१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५३७

निर्णय दिनांक ०२-०७-२०१०

१ श्री. मनिष कालिदासराव मद्रेवार, : अपिलार्थी
रा. सुंदरगंगा सदन, ब्राम्हण गल्ली, शिवाजी रोड, अहमदपूर,
जि. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
दुय्यम निबंधक कार्यालय, कळमनुरी, जि. हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
दुय्यम निबंधक, कळमनुरी, जि. हिंगोली

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : दुय्यम निबंधक, कळमनुरी, जि. हिंगोली
जन अपिलीय अधिकारी : सह जिल्हा निबंधक, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१०-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नाही व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत लागू असलेले शासकीय शुल्क न घेता १७ कागदपत्रासाठी ३४०/- रु इतकी रक्कम त्यांच्याकडून घेतली आहे व अधिनियमातील तरतुदीचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करावी, अशी विनंती या अपील अर्जामध्ये त्यांनी केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, दुय्यम निबंधक कार्यालय, कळमनुरी यांच्याकडे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे संदर्भीत केलेल्या दस्तऐवजाच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०२-१०-२००९ रोजी दुय्यम निबंधक, कळमनुरी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या प्रकरणी सह जिल्हा निबंधक, परभणी हे जन अपिलीय अधिकारी असताना, दुय्यम निबंधक, कळमनुरी यांनी अपिलार्थीचा दिनांक ०२-१०-२००९ रोजीचा अर्ज सह जिल्हा निबंधक, परभणी यांच्याकडे पाठविणे गरजेचे होते. तथापि त्यांनी अशा प्रकारे कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस परत त्यांच्याकडील दिनांक ०८-१०-२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिनांक १८-०९-२००९ रोजी माहिती पाठविल्याचे कळविले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

या टप्प्यावरील संपूर्ण घटनाक्रमाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीच्या दिनांक ०२-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या प्रकरणाशी संबंधित जे जन अपिलीय अधिकारी - सह जिल्हा निबंधक, परभणी आहेत, यांच्याकडून कोणतीही सुनावणी झाली असल्याचे आयोगास आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये ज्या जोडपत्र 'ब' ची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे, त्यामध्ये अपिलार्थीने सदरचे अपील एका साध्या

कागदावर केले असून, या अपील अर्जावर विहित कार्यपध्दतीनुसार २० रु. इतक्या किमतीचे कोर्ट स्टॅम्प चिकटून सदर अपील अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे सादर केलेला नाही. या प्रकरणी मूळात या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या अपील अर्जाची सुनावणी झाली नसल्यामुळे, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणाशी संबधित त्यांचे प्रथम अपील राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्रमांक आर. टी. आय. २००५ / सिआर ३१५/०५/५, दिनांक ११-०५-२०१० मधील तरतुदीनुसार सह जिल्हा निबंधक, परभणी यांच्याकडे करावे. सह जिल्हा निबंधक, परभणी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीचे असे परिपूर्ण अपील त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या प्रकरणी झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सदर अपील त्यांना प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या प्रकरणी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनिष कालिदासराव मद्रेवार, रा. सुंदरगंगा सदन, ब्राम्हण गल्ली, शिवाजी रोड, अहमदपूर, जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, कळमनुरी, जि. हिंगोली यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५४०

निर्णय दिनांक : ०२.०७.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. धनराज डिगंबर चौधरी,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : विभागीय शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०७.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी,श्री. अनिल श्रीनिवास भानप,विज्ञान सल्लागार यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले

दि.०१.०७.२०१० रोजीचे एक निवेदन आयोगास सादर केले असून या निवेदनामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना मिळाली आहे आणि प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिलेले नाही. त्याचप्रमाणे आयोगाकडे दाखल केलेले अपील क्र. १५४०/०९ स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद करुन विचाराधीन अपील रद्द करण्याची त्यांनी या निवेदनाच्या अखेरीस आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली असल्यामुळे अपिलार्थीची सदरची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२.०७.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. धनराज डिगंबर चौधरी,रा.एन-११, ए-८/४, सुदर्शननगर, हडको,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५४९

निर्णय दिनांक ०३-०७-२०१०

१ श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपिलार्थी
रा. हिना मंजील, टाऊन हॉल, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
क्रीडा उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा क्रीडा अधिकारी, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-११-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०७-२०१० रोजी आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे पत्र सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने

असे नमूद केले आहे की, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर त्यांच्या घरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती पाठविण्यात आली व ती परिपूर्ण माहिती त्यांना दिनांक २०-११-२००९ रोजी प्राप्त झालेली आहे. अशाप्रकारे अपिलार्थीने ज्या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे ते कारण आता निकाली निघाले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, रा. हिना मंजील, टाऊन हॉल, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, आमखास (शिवाजी) मैदान, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५५३

निर्णय दिनांक ०३.०७.२०१०

१ श्री. कुडदे प्रकाश विठ्ठलराव, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे
२ जन अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,पुणे
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक (सं.),
अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिलीही नाही किंवा नाकारलीही नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.०४.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील करुनही त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलासंदर्भात कोणताही निर्णय दिला नाही. त्यांनी ही कृती जाणीवपूर्वक केली असल्यामुळे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे शास्ती लावावी व त्यांच्यावर

अधिनियमातील कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी त्यांनी यामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९८६ ते २००० या कालावधीतील महादेव कोळी व मन्नेरवारलू या जातीच्या प्रमाणपत्राच्या संदर्भात एकूण आठ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे ती पाहून जाण्याचे सूचित केले. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.०४.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवली असता, सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. परिणामी अपिलार्थीस त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात काहीही ज्ञात न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०७.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी संबंधित घटनाक्रमाशी संबंधित वस्तुस्थिती आयोगास अवगत केली.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता अपिलार्थीच्या दि. २९.०४.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक(सं.),अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,पुणे यांनी या संदर्भात प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आयोगास

गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक(सं.),अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,पुणे यांनी अपिलार्थीच्या दि. २९.०४.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक(सं.),अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,पुणे यांनी अपिलार्थीच्या दि.२९.०४.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ०३.०७.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कुडदे प्रकाश विठ्ठलराव,रा.माऊली निवास, संभाजी नगर, नगररोड, बालेपीर,बीड, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र

समिती, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक(सं.),अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५६०

निर्णय दिनांक ०५-०७-२०१०

१ श्री. बी. बी. सोनवणे, : अपिलार्थी
रा. हॉल नं. ४-३५-४०२, प्लॉट नं. सी-१९, गल्ली नं. -०६,
गजानन नगर, गारखेडा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-११-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना मान्य नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्रमांक ४६२६ दिनांक ०३-०७-२०१० अन्वये अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २८-०६-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक १५६०-२००९ हे, ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १५६०/२००९, दिनांक २४-११-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बी. बी. सोनवणे, रा. हॉल नं. ४-३५-४०२, प्लॉट नं. सी-१९, गल्ली नं. -०६, गजानन नगर, गारखेडा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५६३

निर्णय दिनांक ०५.०७.२०१०

१ श्री. राजेंद्र देविदास काटे, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापिका,
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलींची, बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि. २७.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणीकरिता जन अपिलीय अधिकारी यांनी दोन वेळा तारीख देऊनही जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन

माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात शाळेतील विद्यार्थी संख्या, शिक्षकांची संख्या, पोषण आहार व फंड जमाखर्च यासंदर्भात काही माहिती मागविली होती व यानंतर विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दि.२७.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दोन वेळा सुनावणी ठेवूनही त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०७.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता व विशेषतः, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २७.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दि. २७.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०५.०७.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र देविदास काटे,रा.कौशल्या हॉटेलच्या मागे, संत नामदेवनगर,धानोरा रोड,बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,जिल्हा परिषद कन्या माध्यमिक शाळा, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५६८

निर्णय दिनांक ०५-०७-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. बाबुराव लक्ष्मणराव वाघमारे,<br>रा. विजयनगर (दगडापूर), पो. चिंचाळा, तालुका बिलोली,<br>जिल्हा नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली,<br>तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली,<br>तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | : प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : श्री. उटलवार (अव्वल कारकून)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातून निर्गमीत झालेल्या संबंधित व्यक्तीच्या लिंगडेर, बुडगा जंगम, माला जंगम, बेडा जंगम आणि येलम या जातीच्या प्रमाणपत्रांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १०-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बिलोली, जिल्हा नांदेड यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आणि अपिलार्थी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागितली आहे, त्यामुळे या घटनाक्रमातील या टप्प्यावर निर्णय घेण्यापूर्वी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बिलोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपले आदेश देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बिलोली, जिल्हा नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बिलोली, जिल्हा नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १०-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाबुराव लक्ष्मणराव वाघमारे, रा. विजयनगर (दगडापूर), पो. चिंचाळा, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३३०

निर्णय दिनांक ०६-०७-२०१०

१ श्री. मनोहर किशनराव पाडळकर, : अपिलार्थी
रा. ५२, श्रीनगर, उल्कानगरीजवळ, गारखेडा परिसर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग)
कार्यालय, येरवडा, पुणे - ६

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग)
कार्यालय, पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी ,कार्यालय, सहसंचालक आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग), पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या सेवापुस्तिकेची द्वितीय प्रत, अंतिम वेतन प्रमाणपत्र आणि

राजीनामा स्वीकृती आदेश ही मे १९५९ ते एप्रिल १९७० या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६-०५-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, आरोग्य सेवा, पुणे यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकाऱ्याने कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जिल्हा हिवताप अधिकारी, औरंगाबाद व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विशेषतः कालावधी आणि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर आणि प्रथम अपील अर्जावर संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद पाहता, अपिलार्थीच्या दिनांक २६-०५-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी होणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, आरोग्य सेवा, पुणे यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २६-०५-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीचे वय लक्षात घेता, सहसंचालक यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी औरंगाबाद येथे घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०५-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनोहर किशनराव पाडळकर, रा. ५२, श्रीनगर, उल्कानगरीजवळ, गारखेडा परिसर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, कार्यालय, सहसंचालक आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग), पुणे - ६ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग), पुणे - ६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५७७

निर्णय दिनांक ०६-०७-२०१०

१ श्री. दिगांबर बाबुराव आमटे, : अपिलार्थी

रा. खांडेपारगांव, पो. अंथरवणपिंप्री, तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा प्राचार्य, श्री शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभागीय

कार्यालय, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. जी. बी. सोंडगे (प्राचार्य)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाव्दारे प्राचार्य, श्री शिवाजी महाविद्यालय, हिंगोली यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्याविषयी त्यांना आदेशित करण्याचे आणि अद्यापपावेतो त्यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना शास्ती लावण्याची विनंती आयोगास केली आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्षासंदर्भात विस्तृत व्याप्ती असलेली काही माहिती एकूण

१२ मुद्दयाव्दारे मागितली होती. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०८-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारीत न केल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष अनुपस्थित व अपिलार्थी, जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभागीय कार्यालय, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभागीय कार्यालय, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील

अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिगांबर बाबुराव आमटे, रा. खांडेपारगांव, पो. अंथरवणपिंप्री, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, श्री शिवाजी महाविद्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभागीय कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५८०
निर्णय दिनांक ०७-०७-२०१०

१ श्री. उदय अरुणराव पालकर, : अपिलार्थी
रा. १३, गट क्र. ९१, उत्कर्षनगर, बीड बायपास रोड,
सातारा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
जागतिक बँक प्रकल्प विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : १) मे. इंडिकॉम कन्स्ट्रक्शन प्रा. लि., पुणे
२) तहसीलदार, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०७-०७-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक १५८०/२००९ हे, ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १५८०/२००९, दिनांक २०-१०-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उदय अरुणराव पालकर, रा. १३, गट क्र. ९१, उत्कर्षनगर, बीड बायपास रोड, सातारा परिसर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५८६

निर्णय दिनांक ०७.०७.२०१०

१ श्री. सूर्यप्रकाश ताराचंदजी बन्सवाल,रा.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक पोलीस आयुक्त,शहर विभाग,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त परिमंडळ,औरंगाबाद शहर,औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्रीमती मिना घनश्याम बरंडवाल,श्रीमती मुन्नी जगदीश बरंडवाल, श्री.दिनेश घनश्याम बरंडवाल, श्री.अजय घनश्याम बरंडवाल, श्री.विजय जगदीश बरंडवाल, श्री.घनश्याम सुरजचंद बरंडवाल, श्री.रेणू घनश्याम बरंडवाल,श्रीमती रविना घनश्याम बरंडवाल,श्री. मनोज अण्णाराम सोलंकी,श्री.सचिन नारायण रमंडवाल

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, पदमपुरा मोची मोहल्ला येथे अनधिकृतपणे दारु विक्री करणाऱ्या एकूण दहा त्रयस्थ व्यक्तींसंदर्भात तीन मुद्यांद्वारे सन १९९४ ते दि. ०३.०६.२००९ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त परिमंडळ, औरंगाबाद (शहर) यांच्याकडे दि. १४.०६.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०७.२००९ रोजी अपिलार्थीचे समाधान झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०७.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०७.२००९ रोजी निर्णय, अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात न घेता - त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून न घेता - दिलेला असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या दि. १४.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदीप्रमाणे प्रथमतः त्रयस्थ पक्षाचे म्हणणे विचारात घेऊन परत सुनावणी घेऊन या संदर्भात आपला निर्णय पारित करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त परिमंडळ, औरंगाबाद (शहर) यांनी अपिलार्थीच्या दि. १४.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत, अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त परिमंडळ, औरंगाबाद (शहर) यांनी अपिलार्थीच्या दि.१४.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७.०७.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सूर्यप्रकाश ताराचंदजी बन्सवाल,अग्रवाल किराणा स्टोअर्स शेजारी, सोनार गल्ली, पदमपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,शहर विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५९०

निर्णय दिनांक ०८-०७-२०१०

१ श्री. बाळासाहेब म्हस्के, : अपिलार्थी
रा. राहूलनगर, रेल्वे स्टेशनजवळ, विनर बेक
रीसमोर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग
सिल्लोड, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता (पूर्व), सार्वजनिक बांधकाम
विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सिल्लोड, जि. औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-११-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी श्री. भारत धोंडीराम तोडकरी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २८-०६-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्राद्वारे अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे ते विचाराधीन अपील स्वखुषीने मागे घेत आहेत, असे अवगत केले आहे. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेली त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती आयोग मान्य करीत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब म्हस्के, रा. राहूलनगर, रेल्वे स्टेशनजवळ, विनर बेकरीसमोर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सिल्लोड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५२१
निर्णय दिनांक ०९/०७/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संतोष यल्हाजी बांगर,<br>रा.हिंगोली | : | अपिलार्थी |
| विरुध्द | | |
| १ जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>हिंगोली | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हा पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>हिंगोली | | |

निर्णय

श्री. संतोष यल्हाजी बांगर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि. २३.१०.२००९ रोजी केलेले दि.०७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २१.०४.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०३.०६.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि. २२.०६.२००९ रोजी निर्णय दिला. यानंतर अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ३१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केल्याचे

आढळून येत आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९/०७/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. संतोष यल्हाजी बांगर, मंगळवारा बाजार, हिंगोली, ता.जि.हिंगोली.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६०७
निर्णय दिनांक ०९/०७/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख समीर शेख शब्बीर,<br>रा.तलवाडा, ता.गेवराई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई,<br>जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, जि.बीड | | |

## निर्णय

श्री. शेख समीर शेख शब्बीर यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २४.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०८.०४.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०१.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केल्याचे आढळून येत आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण

आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९/०७/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.शेख समीर शेख शब्बीर, रा.तलवाडा, ता.गेवराई, जि.बीड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६०१
निर्णय दिनांक ०९-०७-२०१०

१ श्री. ए. ए. खान, : अपिलार्थी
द्वारा, किशोर भिंगारे, न्यू पहाडसिंगपुरा, शासकीय विद्यान
महाविद्यालयासमोर, हनुमान टेकडी परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग
कन्नड, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कन्नड (पूर्व), जि. औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. मंजूर अहेमद (शाखा अभियंता)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी श्री. एन. एस. शेगोकर यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०९-०७-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक १६०१/२००९ हे, ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १६०१/२००९, दिनांक १३-११-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ए. ए. खान, द्वारा, किशोर भिंगारे, न्यू पहाडसिंगपुरा, शासकीय विद्यान महाविद्यालयासमोर, हनुमान टेकडी परिसर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कन्नड (पूर्व), जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६१३
निर्णय दिनांक १२/०७/२०१०

१ श्री. कुरेशी अ.रशीद पि.शेख चाँद, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक, जमहूर हायस्कूल, चर्च रोड, उदगीर, जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर

निर्णय

श्री. कुरेशी अ.रशीद पी.शेख चाँद यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०९.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २१.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०९.०६.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केल्याचे आढळून येत आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण

आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १२/०७/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. कुरेशी अ.रशीद पि.शेख चाँद, मोहल्ला पंचकी, भाजी मंडई जवळ, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६१४
निर्णय दिनांक १२/०७/२०१०

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपिलार्थी
रा.नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

निर्णय

श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दि.१९.११.२००९ रोजी केलेले दि.२५.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०१.०६.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. ०४.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केल्याचे आढळून येत आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण

आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १२/०७/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, रा.घर.नं.९-४-१०६१, रामरहीमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड, ता.जि.नांदेड-४३१६०४.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३२१

निर्णय दिनांक १२-०७-२०१०

१ श्री. राम रुस्तुमराव लांडे, : अपिलार्थी
श्री. ए. बी. शिंगाडे, रा. होळकरनगर, अंबड,
तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०७-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच श्री. संजय व्यंकटराव पडलवार, उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०६-०७-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक २३२१/२००८ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०७-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राम रुस्तुमराव लांडे, रा. होळकरनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.